# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 11/12/2019 (बुधवार)
# (सकाळ)

---

## खून करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 20 कि.मी. अंतरावर मौजा डोंगरमौदा शिवार येथे दिनांक 08/12/2019 चे 16.16 वाजता फिर्यादी नामे– सौ. अनिता सतिश बनसोड, वय 34 वर्ष, रा. येरखेडा, पो. चौकी जवळ कामठी यांची आई नामे– श्रीमती लीलाबाई सूर्यभान वासनीक (मृतक) वय 65 वर्ष या घरी न परतल्याने फिर्यादींनी मौजा डोंगरमौदा शिवारात शेतीत जाउन पाहनी केली. दरम्यान त्या ठिकाणी फिर्यादींच्या आईच्या हाडांचा जळालेला चूरा, हिरव्या रंगाचा बांगडयाच्या तूकडा, 15 ते 20 फूट अंतरावर डेक्याचे काळे केस पडलेले होते. तसेच अंदाजे 50 फूट अंतरावर डोक्याची कवटी दिसून आली. बांगडीचा तूकडयावरून ती फिर्यादींची आई असल्याचे फिर्यादीने ओळखले. जळून मरण पावल्याने पोस्टे ला मर्ग क्र 23/2019 कलम 174 जाफौ प्रमाणे दाखल करण्यात आला. सदर मर्गचे चौकशीमध्ये फिर्यादी साक्षीदार नातेवाईक यांचे बयानावरून आरोपी नामे– राजू रतिराम सोनटक्के, वय 30 वर्ष, रा डेंगरमौदा, ता. कुही रा दहेगाव, ह.मू.धरमनगर कळमना, नागपूर याच्या गायी मृतक यांच्या शेतात येवुन त्यांनी तुरीचे पिक खाल्ले. यावरून मृतक हिचा मुलगा राहुल वासनिक याचे आरोपी सोबत भांडण झाले होते. त्या वादावरून आरोपीने तोच राग मनात ठेवुन मृतक हिच्या डोक्यावर काडीने मारहाण करून तिला जिवानीशी ठार केले व तिचे प्रेत पुरावा नष्ठ करण्याचे उद्‌देशाने जाळुन टाकल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 302, 201 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड पोर्णिमा तावरे या करीत आहे.

<u>चोरी</u>

<u>पो.स्टे. नरखेड</u> :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर सावरगाव समोर येथे दिनांक 09/12/2019 चे 23.00 वा. ते दिनांक 10/12/2019 चे 05.00 वा. दरम्यान एमएच–27/बीएक्स–2224 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– उमेश दिवाकर काकडे, रा. तळेगाव, शामजी पंत जि. वर्धा हा क्षमतेपेक्षा जास्त रेती भरून नेत असल्याने श्री. हरिष गाडे तहसीलदार नरखेड यांनी कायदेशीर कार्यवाही करून टिप्पर डिटेन केला. दरम्यान आरोपी टिप्पर चालक व टिप्पर मालक आरोपी नामे– दामोदर रंगरावजी गावनार रा. भारवाडी तर. तीवसा जि. अमरावती यांनी सगंणमत करून सदर टिप्पर रेतीसह कि. 6,20,000/– रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार धनराज भुक्ते हे करीत आहे.

<u>पोलीस माहिती कक्ष</u>
<u>नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर</u>